# चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था लि., चिपळूण

## २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था लि., चिपळूण या संस्थेच्या अधिमंडळाची सन २०२०-२०२१ ची वार्षिक सर्वसाधारण सभा **गुरुवार दि.३०-०९-२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता** संस्थेच्या प्रधान कार्यालय बहादूरशेख, चिपळूण, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथून महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचेकडील दि. ०३ सप्टेंबर २०२१ च्या आदेशानुसार **ऑनलाईन पध्दतीने** खालील कामांचा विचार करणेसाठी होणार आहे. तरी आपण आपल्या सोयीच्या ठिकाणाहून संस्थेच्या **https://cnspsagm2021.ruha.co.in** या लिंकवर आवश्यक माहिती भरुन बैठकीच्या कामकाजात सहभागी व्हावे, अशी विनंती आहे.

**सभेपुढील विषय**

१. दि.२६.०३.२०२१ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. दि.३१ मार्च २०२१ अखेर संपलेल्या वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच व्यवसाय प्रमाणके व इतर माहिती आणि संचालक मंडळाच्या शिफारशीप्रमाणे नफा विभागणी मंजूर करणे.
३. सन २०२१-२२ सालचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व सन २०२०-२१ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
४. महाराष्ट्र सहकारी संस्था नि.३५ प्रमाणे बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.
५. अंतर्गत तपासणीसाची नेमणूक करणे.
६. आर्थिक वर्ष २०२०-२०२१ चे लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे. तसेच आर्थिक वर्ष २०१९-२०२० चा लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
७. निबंधकानी जाहीर केलेल्या पॅनेलमधील पात्र वैधानिक लेखापरीक्षकाची चालू आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी नेमणूक करणे. लेखापरीक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.
८. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबतची नोद घेणे.
९. संस्थेच्या शाखा विस्ताराच्या कृती आराखड्यास मान्यता देणे.
१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११. क्रियाशील सभासदांसंबंधी निकष पूर्ततेची माहिती सादर करणे.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामासंबंधी विचार करणे.

**ठिकाण : चिपळूण**
**दिनांक : १५-०९-२०२१**

**संचालक मंडळाचे अनुज्ञेने**
**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सूचना : १.** सदर सभेस आवश्यक असणारी गणपूर्ती न झाल्यास सभेचे कामकाज ३० मिनिट तहकूब ठेवण्यात येईल व तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच लिंकवर ११.०० वाजता सुरु होईल. यास गणपूर्तीची अट असणार नाही. **२.** ज्या सभासदांना काही सूचना करावयाच्या असतील त्यांनी लेखी स्वरुपात संस्थेच्या शाखा प्रधान कार्यालयात किंवा संस्थेच्या **chiplun_nagari@yahoo.com** या मेल आयडीवर कार्यालयीन वेळेत दि.२०.०९.२०२१ पर्यंत द्याव्यात. त्यानंतर येणाऱ्या सुचनांचा विचार केला जाणार नाही. **३.** संस्थेचा २८ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक संस्थेच्या सर्व शाखांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आला आहे व वार्षिक अहवालाच्या प्रती सर्व शाखांमध्ये उपलब्ध करुन ठेवलेल्या आहेत. **४.** सभासदांव्यतिरिक्त इतर कोणालाही दिलेल्या लिंकचा विनियोग करुन सहभागी होता येणार नाही.